MHPA140007882021

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०४.०९.२०२१ |
| नोंदणी तारीख | : | ०४.०९.२०२१ |
| निकाल तारीख | : | २२.०७.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०४ १० १८ |

**नियमित फौजदारी खटला क्र. १७०/२०२१** **निशाणी क्र. ४२**

फॉर्म क्र. ३२

**भाग – अ**

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)

(फौजदारी नियमावलीचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(१) प्रमाणे)

<table>
<tr><td colspan="3">विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी<br>(पिठासीन अधिकारी एस. एस. साळुंखे)<br>(दिनांक २२.०७.२०२६)<br>(नियमित फौजदारी खटला क्र. १७०/२०२१)</td></tr>
<tr><td colspan="3">(गुन्हा क्र. २२२/२०२१, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ५०४ व ५०६ सह वाचनीय कलम ३४ प्रमाणे, पोलीस स्टेशन – पूर्णा, तालुका – पूर्णा, जिल्हा – परभणी.)</td></tr>
<tr><td>अभियोग पक्ष</td><td></td><td>महाराष्ट्र सरकार तर्फे पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन – पूर्णा,<br>तालुका – पूर्णा, जिल्हा – परभणी</td></tr>
<tr><td>सरकार तर्फे –</td><td></td><td>श्री. पी. एन. सोळंके, विशेष सरकारी वकील.</td></tr>
<tr><td>आरोपी क्र. १</td><td></td><td>राहुल गौतम अहिरे,<br>वय – २३ वर्षे, व्यवसाय – मजुरी,</td></tr>
<tr><td>आरोपी क्र. २</td><td></td><td>गौतम राजाराम अहिरे,<br>वय – ४६ वर्षे, व्यवसाय – मजुरी,</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| आरोपी क्र. ३ | | सुशीला गौतम अहिरे,<br>वय – ३९ वर्षे, व्यवसाय – घरकाम,<br>सर्व रा. पंचशील नगर, पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी. |
| आरोपींतर्फे | | श्री. ए. एस. पाईकराव वकील. |

**भाग – ब**

(फौजदारी नियमावलीचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(२) प्रमाणे)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०३.०६.२०२१ |
| छापील प्रथम खबर अहवालाचा दिनांक | ०३.०६.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०४.०९.२०२१ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | ०८.०८.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १५.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २२.०७.२०२६ |
| शिक्षा सुनावनीचा दिनांक, असल्यास | -- |

## आरोपींचा तपशील

| आरोपींची श्रेणी | आरोपींचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटण्याची तारीख | गुन्हयाचे आरोप सह | निर्दोष असो वा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीमान म्हणुन असलेला कालावधी फौ. प्र. सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राहुल गौतम अहिरे | फौ.प्र.सं. चे कलम ४१ (१) अन्वये नोटीसवर सोडण्यात आले | दिनांक ०८.०८.२०२३ | भा. दं. वि., १८६० चे कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष सोडले. | -- | -- |
| २. | गौतम राजाराम अहिरे, | | | | | | |
| ३. | सुशिला गौतम अहिरे | | | | | | |

**भाग — क**

(फौजदारी नियमावलीचे प्रकरण ६ मधील परिच्छेद क्र. ४४(३) प्रमाणे)
अभियोग पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालय साक्षीदारांची यादी

अ – अभियोग पक्ष :–

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा. क्र. १ | वंदना दशरथ ननवरे | तक्रारदार |

ब – बचाव पक्षाचे साक्षीदार, जर असतील तर :–

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क – न्यायालयीन साक्षीदार, असतील तर :–

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**फिर्यादी/बचाव/न्यायालय निशाणी क्रमांकाची यादी**

अ – अभियोगपक्ष :–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. ३८ | तक्रारवरील सहीस |

ब – बचाव :–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. ४० | घटनास्थळ पंचनामा |
| २. | निशाणी क्र. ४१ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

क – न्यायालयीन निशाणी :–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

ड – भौतिक वस्तू :–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## न्या य नि र्ण य

(दिनांक २२.०७.२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचे प्रकरण आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे चालविण्यात आले.

**अभियोग पक्षाच्या केसची थोडक्यात हकीकत**

**२.** दिनांक ०३.०६.२०२१ रोजी सायंकाळी १७.३० वाजता फिर्यादीच्या घरी घटना घडली. सदर दिवशी आरोपींनी फिर्यादी हिस ''राजाराम बालाजी आहिरे यांचे पेन्शन तुम्ही एकटेच कसे काय खाता'' असे म्हणून आरोपी क्र. १ ने हातातील काठीने फिर्यादीच्या डोक्यात मारुन जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपी क्र. २ व ३ यांनी शिवीगाळ केली. सदर आशयाची फिर्याद पूर्णा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली.

**३.** सदरच्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन, पूर्णा येथे गुन्हा रजिस्टर क्र. २२२/२०२१ अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोहेकॉ आर. डी.

तोटेवाड यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. त्यांनी तपासाअंती आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** प्रस्तुत प्रकरणात आरोपी हजर झाल्यानंतर माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपींविरुध्द निशाणी क्र. १० प्रमाणे दोषारोप ठेवला. सदरचा दोषारोप आरोपीस वाचून व समजावून सांगितला असता आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले. त्यामुळे आरोपींविरुध्द प्रकरण पुढे चालविण्यात आले.

**५.** अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे उपस्थित झाले त्यांचे निष्कर्ष व कारणे खालील प्रमाणे आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०३.०६.२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेच्या सुमारास फिर्यादीच्या घरासमोर, पंचशील नगर, पूर्णा ता. पूर्णा जि. परभणी येथे आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादीस काठीने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली, असे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का ? | .... नकारार्थी. |
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी आपसात संगनमत करुन, फिर्यादीस शिवीगाळ करुन प्रक्षभित केले, असे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का ? | .... नकारार्थी. |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी आपसात संगणत करुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारी पात्र धाकदडपशा दाखविला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | .... नकारार्थी. |
| ४. | अंतिम आदेश ? | .... आरोपींची निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

६. प्रस्तूत प्रकरणामध्ये अभियोगपक्षातर्फे फिर्यादी वंदना दशरथ ननवरे (अ.सा.क्र.१) यांचीच साक्ष नोंदविण्यात आली. फिर्यादी यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. तसेच फिर्यादीने निशाणी क्रमांक ३६ वर तडजोडपत्र व निशाणी क्रमांक ३९ वर पुरावा बंद पुरसीस दाखल केली. त्यामुळे उर्वरीत साक्षीदार यांना समन्स काढून काही साध्य होणार नसल्यामुळे मी निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. आरोपींविरुध्द कोणताही पुरावा न आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन माफ करण्यात आले. अभियोगपक्षातर्फे श्री. पी. एन. सोळंके, विशेष सरकारी वकील यांचा व आरोपी तर्फे श्री. ए. एस. पाईकराव यांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दे क्र. ०१ ते ०३ करीता</u>** –

७. मुद्दा क्र. ०१ ते ०३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांची चर्चा एकत्रीत करण्यात आलेली आहे. फिर्यादी वंदना दशरथ ननवरे (अ.सा.क्र.१) यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. तसेच त्यांचा घटनेच्या दिवशी आरोपींसोबत थोडी किरकीर झाली होती, या व्यतिरीक्त इतर काहीही घडले नाही असे त्यांनी कथन केले. तसेच दिनांक ०३.०६.२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वाजण्याच्या आरोपींनी फिर्यादीस ''तुम्ही राजाराम बालाजी आहिरे यांची पेन्शन का खाता'' या करणावरुन काठीने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली आणि शिवीगाळ केली, या सर्व बाबी अभियोग पक्ष सिध्द करु शकला नाही. तसेच फिर्यादी व आरोपीं यांच्यामध्ये झालेली तडजोड लक्षात घेता आरोपींस सदर गुन्ह्यांशी जोडणे उचित

होणार नाही. अशा परिस्थितीत तडजोड झालेची बाब लक्षात घेता, यातील आरोपींना निर्दोष मुक्त करणे योग्य व न्यायोचित ठरेल.

८. वरील सर्व ऊहापोहावरुन मी या निष्कर्षास आलो आहे की, फिर्यादीने अभियोग पक्षास साथ न देणे व दोन्ही पक्षाचे न्यायालयाबाहेर तडजोड होणे हे अभियोग पक्षास आरोपींविरुध्दचे अपराध सिध्द करण्यास मारक ठरलेले आहे. त्यामुळे अभियोग पक्ष हे आरोपींविरुध्दचे कोणतेही अपराध शाबीत करण्यास अयशस्वी ठरले आहे. म्हणून आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र.०१ ते ०३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र. ०४ करीता</u> –

९. आरोपींनी गुन्हा केला ही बाब अभियोगपक्ष शाबीत करु शकला नाही. अशा परिस्थितीत आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत, म्हणून मुद्दा क्रमांक ०६ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. १ राहुल गौतम अहिरे, २. गौतम राजाराम अहिरे आणि ३. सुशिला गौतम अहिरे यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ या गुन्ह्याच्या आरोपांतून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ च्या तरतुदीनुसार प्रत्येकी रुपये १५,०००/– चा जामीन व वैयक्तीक जात मुचलका देवून पूर्तता करावी. |

| | |
|---|---|
| ४. | जप्त मुद्देमाल एक काठी ही मुल्यहीन असल्यामुळे त्याचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.07.22 18:18:25 +0530

(एस. एस. साळुंखे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पूर्णा जि. परभणी.

दिनांक – २२.०७.२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Orders are same word for word as per original Judgment/ Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Balasaheb G. Kadam |
| Court Name | : J.M.F.C., Purna. |
| Date | : 22.07.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer | : 22.07.2026 |
| Judgment/Order Uploaded on | : 22.07.2026 |